**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३१९/२०२६**

**निशाणी क्र.**

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **गुन्हा घडला तारीख** | : | **२६.०३.२०२६** |
| **२.** | **खबर दिल्याची तारीख** | : | **२६.०३.२०२६** |
| **३.** | **खबर देण्याऱ्याचे नांव** | : | **करमाळा पोलीस स्टेशन, सोलापूर.** |
| **४.** | **आरोपीचे नांव** | : | **जयदीप देवराव पवार**<br>वय–४३ वर्षे, धंदा– शेती<br>रा. रावगाव, ता.करमाळा, जि.सोलापुर. |

**५. आरोपीत गुन्हे :** ज्याअर्थी, दि.२६.०३.२०२६ रोजी ९.५० वाजता केतूरनाका, करमाळा येथील सार्वजनिक रस्त्यावर तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन क्र.एम.एच.४५/२५४६ हे अविचाराने हयगयीने व रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन रस्त्यावरुन येणारे जाणारे लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा बेदरकारपणे चालविले व त्याअर्थी तुम्ही, **भारतीय न्याय संहिताच्या कलम २८१** प्रमाणे गुन्हा केला असा तुमच्यावर आरोप आहे.

**<u>आरोपीचे प्रतिकथन/कबुली –</u>**

प्र.१ : तुम्हाला दोषारोपांचा आशय समजला काय ?

उत्तर : होय.

प्र.२ : तुम्हाला पोलीस कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर : होय.

प्र.३ : तुम्हाला आरोपीत गुन्हे कबुल आहेत काय ?

उत्तर : होय, मला गुन्हा कबुल आहे.

ता. ०९/०५/२०२६

_______________________

आरोपीची सही / अंगठा

समक्ष

SHARAWARI PRITHVIRAJ KULKARNI

Digitally signed by SHARAWARI PRITHVIRAJ KULKARNI
Date: 2026.05.09 12:47:50 +0530

**(श्रीमती एस.पी. कुलकर्णी)**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, करमाळा

## **न्यायनिर्णय / आदेश**

(आज तारीख ०९/०५/२०२६ रोजी पारित)

आज रोजी आरोपी माझेसमोर हजर झाला. त्याने गुन्हा कबुल केला. आरोपीने विनंती केली की, तो घरातील एकमेव कर्ता इसम आहे. त्याचेवर अनेक कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत, त्यामुळे त्याचेवर दया दाखवून कमीतकमी शिक्षा देण्याची विनंती केली. गुन्ह्याचे स्वरुप व आरोपीची आर्थीक परिस्थिती पाहता, माझे मते खालील आदेश करणे न्यायोचित होईल.

**आ दे श**

१. आरोपी **जयदीप देवराव पवार** यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१ प्रमाणे दंडनिय गुन्ह्यासाठी दोषी धरण्यात येत आहे.

२. आरोपीने भा.न्या.सं. कलम २८१ या गुन्ह्याबाबत **रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे मात्र)** इतका द्रव्यदंड अदा करावा, अशी शिक्षा त्यांना फर्माविण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने दोन दिवस साधी कैद भोगावी असेही फर्माविण्यात येत आहे.

३. प्रकरण संपले.

ता. ०९/०५/२०२६

SHARAWARI PRITHVIRAJ KULKARNI

Digitally signed by SHARAWARI PRITHVIRAJ KULKARNI
Date: 2026.05.09 12:47:55 +0530

**(श्रीमती एस.पी. कुलकर्णी)**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, करमाळा

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | A.M. Raut, Grade-3 |
| b) | Date of Judgment/Order | : | 09.05.2026 |
| c) | Judgment/Order signed by | | |
| | the Presiding Officer on | : | 09.05.2026 |
| d) | Judgment/Order uploaded on | : | 09.05.2026 |